http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part—III) Examination

## (Optional Subject)

## (Literature of Modern Languages)

## MARATHI LITERATURE

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

**सूचना :— सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

1. पुढील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा :— 20

(अ) "मधुनच एखादा गुडुप अंधाराचा आधार देणारा पुलाखालचा बोगदा. जाणता गोंडोलेवाला तिथे वेग आवरतो. त्या अंधाराच्या पांघरूणाखाली त्या जोडप्याला रेंगाळत ठेवतो.''

**किंवा**

"नेपल्सला इटालियन भाषेत 'नापोली' म्हणतात, हे तेव्हा कळले! त्यामुले 'दापोली' चे खरे नाव काय बरे असावे, असाही एक भाषाशास्त्रीय प्रश्न माझ्या मनाला चाटून गेला !''

(आ) "हे पॅरिस आहे, नेपल्स आहे, क्योटो आहे आणि हाँगकाँगही आहे, पण हे सगले असूनही हे सान्फ्रान्सिस्को आहे.''

**किंवा**

"ह्यातली प्रत्येक वस्तू ही गेझाकाकांनी पोर्सेलिनमध्ये रचलेली एक-एक सुंदर कविता आहे !''

(इ) "सायब मव्ह लेक्रू लहान हाय. त्येच्या व्हटावरलं दूधसुद्धा वाळलं न्हाय. ते धांदरून मरंल हो सायब. त्येला सोडा. त्येच्यावारचं मला न्या, पर त्येला सोडा.''

**किंवा**

"मी पांड्याला घिऊन जाते. मह्या भावाला धुंडते. त्येईच्यापसीऱ्हाते. काम करून खाते. हीतबी तर तेच हाय. आन वरून बंडयांची दादागिरी. नवऱ्यावूनबी जास्त.''

(ई) "अरे मह्या उजव्या हातातून वारं गेहं. त्येच्यात जीव ऱ्हाय ऱ्हायला. ह्यो बग लुळपुट झाला. आता मला काम व्हनार न्हाय. मव्ह कसं व्हईल, मव्ह घर कोन धकवील ? म्या मरतुरे बापा.''

**किंवा**

"मामाजी, मामाजी, तुम्ही यशोदाला समजावून सांगा. तिचं पाऊल वाकडं पडायला लागलंय.''

2. पु.ल. देशपांडे यांनी 'जावे त्यांच्या देशा'या पुस्तकातून 'एक बेपत्ता देश' कसा चित्रित केला आहे. तुमच्या शब्दात लिहा. 20

**किंवा**

'जावे त्यांच्या देशा' या पुस्तकाचे परिक्षण करा.



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

3. 'बिराड' मधून आलेले भटक्या जमातीचे वर्णन हे प्रतिनिधिक स्वरूपाचे आहे. सविस्तर मांडा. 20

**किंवा**

अशोक पवार यांनी 'बिराड' मधून बेलदार समाजाच्या जीवन संघर्षाचे चित्रण केले आहे. पटवून द्या.

4. भाषा म्हणजे काय ? भाषेचे स्वरूप व उपयोग स्पष्ट करा. 20

**किंवा**

अर्थदृष्ट्या अधिक विभाजन न होता भाषेचा सर्वात लहान घटक म्हणजे रूपिका होय. सविस्तर सांगा.

5. वाक्यविचार म्हणजे काय ते सांगून, वाक्यांचे वर्गीकरण करा. 20

**किंवा .**

पुढीलपैकी कोणत्याही **दोनवर** टीपा लिहा :—

(1) प्रमाणभाषा

(2) स्वनिम

(3) पदविचार

(4) भाषेचे उच्चारण व लेखन.



http://www.sgbauonline.com/